# जाहिरात मसुदा

गोवर्धन गोवंश सेवा केंद्र हि नविन योजना सन २०१९-२० या आर्थिक वर्षापासून उस्मानाबाद जिल्हयातील ३ विभागीय महसूल मंडळातून प्रत्येकी एक याप्रमाणे गोशाळांची अनुदानासाठी निवड करण्यास शासनाची मान्यता प्राप्त झालेली आहे. त्यानुसार उपविभागीय अधिकारी उस्मानाबाद, उपविभागीय अधिकारी कळंब व उपविभागीय अधिकारी उमरगा या महसूल विभागात राबविण्यात येणार आहे. या योजने अंतर्गत पशुधनासाठी नविन शेडबांधकाम चारा व पाण्याची व्यवस्था, कडबाकुटटी यंत्र, मुरघास प्रकल्प, गोमुत्र व शेणावरिल प्रक्रिया प्रकल्प इ.बाबीसाठी अनुदान मिळणार आहे. तदअनुशंगाने इच्छुक गोशाळा धारकांनी संबधित तालुक्याचे पशुधन विकास अधिकारी (वि) यांच्या मार्फत परिपुर्ण प्रस्ताव या कार्यालयास सादर करावा. (दि. 30.6.2019 पर्यंत)

असे अवाहन जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, उस्मानाबाद यांनी केले आहे.

**जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त**
**उस्मानाबाद**